

दैनिक

# विश्वजगत

RNI No:- MAHMAR/2023/86213

https://epaper.dainikvishwajagat.in

मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185

E-mail : dainikvishvjagato101@gmail.com



■ बुलडाणा ■ वाशिम ■ अकोला ■ अमरावती ■ यवतमाळ ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ परभणी ■ जालना ■ नाशिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■ रायगड ■ ठाणे

बुधवार दिनांक 2 जुलै 2025 | वर्ष : 2 रे | अंक : 52 वा | पाने : 4 | किंमत : 5 रूपये


## ॲड. योगेश जगदाळे यांचा भाजपामध्ये प्रवेश.



संतोष पडवळ: दैनिक विश्वजगत

ठाणे: भारतीय जनता पार्टीचे आमदार श्री नरेंद्र मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणादायी नेतृत्वाखाली समाजसेवक व ॲडव्होकेट योगेश सदाशिव जगदाळे यांनी भारतीय जनता पक्षावर विश्वास व्यक्त करत पक्षप्रवेश केला. प्रसंगी भाजपा नेते डॉ. सुरेश येवले, श्यामराम (दादा) मदने, बाळु वाघमारे, छोटू (दादा) शर्मा, सुमीत पाटील, कल्पना परांगे आणि सोनार सुरेखा (नगरसेवक) हे मान्यवर उपस्थित होते. ॲड. योगेश सदाशिव जगदाळे यांचे भाजपकडून स्वागत करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल राजकीय आणि सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहे.

# माऊलींच्या पालखीचे पुरंदरवडेमध्ये रंगले पहिले गोल

## रिंगण हरि नामाच्या जयघोषाने आसमंत दुमदुमला, दिव्य सोहळ्याने फेडले डोळ्यांचे पारणे

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे पहिले गोल रिंगण सोहळा सोमवारी पुरंदरवडे येथे मोठ्या भक्तिभावात आणि जल्लोषात पार पडले.

टाळ-मृदुंगांच्या निनादात, “माऊली माऊली” च्या जयघोषात अश्वांच्या नेत्रदीपक तीन फेऱ्यांनी रिंगणाला प्रारंभ झाला. या दिव्य सोहळ्याने लाखो भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

नातेपुते मुक्कामानंतर माऊलींची पालखी जयघोषात पुरंदरवडे येथे पोहोचली. सकाळीच रिंगण मैदानावर भाविकांची गर्दी उसळली होती. दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास माऊलींचा रथ रिंगण स्थळी दाखल झाला. पालखीने



एक फेरी घेतल्यानंतर मध्यभागी तिची स्थापना करण्यात आली. यावेळी अर्जुनसिंह मोहिते पाटील, सरपंच राणी मोहिते आणि उपसरपंच देविदास ढोपे यांच्या हस्ते पालखीची पूजा झाली.

चोपदार बाळासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रिंगणाची तयारी झाली. दुपारी १.२२ वाजता अश्वांना रिंगणासाठी सोडण्यात आले, आणि माऊलींच्या जयघोषात अश्वांनी तीन



फेऱ्यांमध्ये जणू भक्तीची उधळण केली. या अश्वांनी सत्तावीस दिंड्यांच्या पुढे आणि वीस दिंड्यांच्या मागे नेत्रदीपक दौड घेतली. लाखो भाविकांच्या साक्षीने रिंगण पूर्ण होताच आसमंत “ज्ञानोबा माऊली तुकाराम” च्या गजरात दुमदुमला.

### रिंगण झाल्यानंतर वारकऱ्यांचे फुगड्यांचे फेर

अश्व पुढे जात असताना त्यांच्या चरणी असणारी रज भाळी लावण्यासाठी एकच झुंबड उडाली. महिला-पुरुषांनी एकत्रित फुगड्यांचे फेर धरले, तर काहींनी टाळ-मृदुंगाच्या तालावर हरिनामाचा ठेका धरला. “विठ्ठलाच्या दारी कोणी लहान थोर नाही” या भावनेने अनेक भाविक एकमेकांचे पाया पडत आपुलकीने भाव प्रकट करत होते.

### सायंकाळी पालखी माळशिरस मुक्कामासाठी मार्गस्थ

रिंगण संपल्यानंतर मैदानात दिंड्यांमधून हुतुतू, कबड्डी, गड्यासगडी, सुरपाट, खो-खो आणि फुगडी यांसारखे पारंपरिक खेळ रंगले. चोपदारांच्या निमंत्रणानंतर सर्व दिंड्या पालखीभोवती गोलाकार बसल्या. टाळ-मृदुंगांच्या गजरात ‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’ चा नादब्रह्म आसमंतात घुमू लागला. वृध्द, तरुण, महिला सारेच या भक्तिरसात चिंब न्हाल्यासारखे नाचत होते. सायंकाळी पालखी माळशिरस मुक्कामासाठी मार्गस्थ झाली.

## चर्चेत राहण्यासाठी नाना पटोलेंचा प्रयत्न होता का ?: उपमुख्यमंत्री एकनाथ

मुंबइ : पावसाळी अधिवेशनात विधानसभेच्या कामकाजात मंगळवारी गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. काँग्रेस नेते आणि माजी विधानसभा अध्यक्ष सुधा नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत थेट अध्यक्षाच्या आसनापर्यंत जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माफीची मागणी केली. त्यांच्या या कृतीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार टीका करत चर्चेत राहण्यासाठी नाना पटोलेंनी असा प्रयत्न केला का ? असा सवाल उपस्थित केला.भाजप नेते बबनराव लोणीकर तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला. यावेळी बोलताना नाना पटोले यांनी मोदी तुमचे बाप असतील, शेतकऱ्यांचे नाही, असे वक्तव्य केले होते. थेट अध्यक्षाच्या डायसवर चढून राजदंडापुढे जाऊन लोणीकर प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागण्याची मागणी केली. यावर एकनाथ शिंदे यांनी उपरोक्त प्रतिक्रिया दिली आहे.

# राजदंडाला स्पर्श- नाना पटोले निलंबित

## शेतकऱ्यांच्या मुद्यांवरुन गदारोळ; काँग्रेसचा फडणवीसांवर तर भाजपचा पटोलेंवर आरोप

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मुंबइ :भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्ह्यात केलेल्या वक्तव्य प्रकरणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी सभागृहात मांडला. या प्रकरणात लोणीकर, कृषिमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यासाठी त्यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाजवळ जात राजदंडला देखील स्पर्श केला. त्यामुळे अध्यक्षांनी त्यांनी एका दिवसासाठी निलंबित केले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रोज निलंबित केले तरी सभागृहात आवाज उचलणार असल्याचे म्हणत देवेंद्र फडणवीस हे शेतकरी विरोधी असल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एक दिवसासाठी निलंबित केले आहे. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला. लोणीकरांनी शेतकऱ्यांचा



अपमान केला असून, त्या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले की, आज शेतकऱ्यांचा दिवस आहे. भाजप महायुतीचे सरकार माज आलेले आहे. या सरकारची वास्तविकता आज समोर आली आहे. यांचे नेते शेतकऱ्यांना भिकारी समजतात. त्यांना कपडे हे घेऊन देतात. 2014 च्या आधी लोणीकर उघडाच फिरत होता. जो शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलेल त्याला निलंबित करणे आणि जे अपमान करतात त्यांना सन्मानाने बसवायचे, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे.

### नेमके काय म्हणाले होते लोणीकर

कुचरवट्यावर बसलेली काही रिकामटेकडी कार्टी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अंधभक्त म्हणतात. या कूचवट्यावर बसून सोशल मीडियावर चर्चा करणाऱ्या कार्ट्यांच्या माईचा पगार आणि बापाचे पेन्शन मीच दिले आहे, असे वादग्रस्त वक्तव्य बबनराव लोणीकर यांनी केले. नरेंद्र मोदींनी तुझ्या बापाला पेरणीला सहा हजार रुपये दिले आहेत. तुझ्या अंगावरचे कपडे, आणि पायातील बुट चप्पल सुद्धा सरकारमुळेच आहे. जालना जिल्ह्यातील परतुर येथे सोलर योजनेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. विधानसभेत लीड नसल्यामुळे नाराजी व्यक्त करत लोणीकरांनी ग्रामस्थांना कानपिचक्या दिल्या. पाच वर्षांचे बलुतं, एक फुली द्या नाहीतर नका देऊ. पण तुम्ही मला नाही दिलं तरी पाच-दहा कोटी मिळतात हे डोक्यातून काढून टाका, असा टोला त्यांनी गावकऱ्यांना लगावला. तसेच, मी एक, दोन, तीन वेळा पाहिलं, त्यानंतर गावावर फुली मारील, असा थेट इशाराही त्यांनी दिला. त्यांच्या या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. सभागृहात काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी लोणीकर यांनी माफी मागावी अशी मागणी केली. त्यासाठी त्यांनी थेट विधानसभा अध्यक्षांच्या आसनासमोर जात राजदंडाला देखील स्पर्श केला.

## वारकऱ्यांसाठी शासनाचा मोठा निर्णय

### पंढरीच्या वारीदरम्यान मृत्यू झाल्यास मिळणार 4 लाखांची मदत, महसूल विभागातर्फे परिपत्रक जारी



प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मुंबइ :शेकडो मैलांचा प्रवास, पायात काटे, अंगावर पाऊस, चिखल, ऊन आणि ज्ञानोबा-तुकारामाचा गजर करत हजारो वारकरी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरच्या दिशेने निघतात. वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यंदा महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान कोणत्याही अपघातात एखाद्या वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. यासंदर्भातले नवे परिपत्रक महसूल विभागाने आज जारी केले आहे.

यंदाच्या वारीसाठी ही योजना 16 जून ते 10 जुलै 2025 या कालावधीत लागू राहणार आहे. या काळात एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना ही मदत दिली जाईल. मात्र, आत्महत्या, विषबाधा (स्वखुशीने), किंवा खून यासारख्या घटनांमध्ये ही मदत मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, अपघातामुळे वारकऱ्यांचे अपंगत्व झाल्यासही सरकारने आर्थिक मदतीची तरतूद केली आहे.




ठाणे : आज दिवा शहरात भारत मुक्ती मोर्चा, बहुजन मुक्ती पार्टी व राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्ती यांसकडून 1 जुलै 2025 रोजी राष्ट्रव्यापी भारत बंद पुकारला होता. भारत बंदच्या पार्श्वभूमीवर आज दिव्यात रॅलीचे आयोजन करून अनेक मागण्यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. प्रसंगी सदर रॅलीत बहुजन क्रांती मोर्चाकडून मागण्या आणि कारणे यांचे पत्रके वाटण्यात आली.(फोटो- संतोष पडवक )



ठाणे : दिवा-मुंबई लोकल सुरु करण्याच्या मागणीसाठी दिवा शहरातील समाजसेविका अश्विनी अमोल केंद्रे यांचे लक्षवेधी बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे. रेल्वे प्रशासनास अनेकदा निवेदन देऊन तसेच प्रत्यक्ष भेटून तसेच रेल्वे आपघात बळींच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने तात्काळ दिवा ते मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल सुरु करावी अशी मागणी केली असून सदर लोकल सुरु करण्यासाठी समाजसेविका अश्विनी अमोल केंद्रे यांचे लक्षवेधी बेमुदत धरणे आंदोलन दिवा रेल्वे स्थानक पूर्व येथे सुरु झाले आहे. (फोटो - संतोष पडवक )

१ २ ३ ४ ५ ६

## 'मावशी'ची माघार

'राष्ट्रभाषा हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' अशा गर्जनांपासून सुरू झालेला पहिलीपासूनच्या हिंदीसक्तीचा प्रवास वळणावळणाने अखेर सपशेल माघारीवर येऊन थांबला आहे. गेल्या दोन महिन्यांत राज्य सरकारने यासंदर्भात अनेक कोलांटउड्या मारल्या, शाब्दिक खेळ केले आणि वकिली युक्तिवादही केले; मात्र विरोधात उभे राहू पाहणारे मराठीजनांचे बिगरराजकीय संघटन, ठाकरे बंधूंची मोर्चेबांधणी आणि मुख्य म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वीच सरकारने शस्त्रे म्यान केली.पहिलीपासून त्रिभाषा धोरण राबविण्याचे म्हणजेच हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही शासन निर्णय मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. आता याबाबत तज्ज्ञांची समिती नियुक्त करून अहवाल आल्यानंतरच सरकार निर्णय घेणार आहे. हिंदी सक्तीला विरोध सुरू झाल्यानंतर लगेचच प्रतिष्ठेचा प्रश्न करून पोकळ समर्थनांचे फुगे उडवण्याऐवजी हा विषय तज्ज्ञांकडे सोपवला असता, तर आजची मुखभंगाची वेळ आली नसती. हिंदीच्या सक्तीच्या निमित्ताने मराठीजनांनी भाषेबाबत दाखविलेल्या एकजुटीचा हा विजय म्हणता येईल. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा (एनईपी) हवाला देऊन हिंदीसक्ती रेटण्याच्या निर्णयाभोवती सुरुवातीपासूनच संशयाचे धुके निर्माण झाले होते. 'एनईपी'मधील त्रिभाषा सूत्रात 'पहिलीपासून' आणि 'हिंदी अनिवार्य' असे कोणतेही उल्लेख नसताना राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये हळूच या हिंदीसक्तीचा चंचूप्रवेश घडविण्यात आला. मराठी शाळांमध्ये पहिलीपासून मराठी आणि इंग्रजी या दोनच भाषा शिकवल्या जातात. इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मात्र या दोन्ही भाषांसह त्या शाळेच्या माध्यमाची भाषाही शिकवली जाते; त्या पार्श्वभूमीवर मराठी शाळांमध्ये तिसरी हिंदी भाषा 'अनिवार्य' करण्याच्या १६ एप्रिलच्या 'शासन निर्णया'वरून समर्थन आणि विरोध असे 'हत्ती आणि चार आंधळ्यांचे आख्यान' महाराष्ट्रात सुरू झाले. 'सहावीपासून मुले हिंदी शिकतच आहेत; पहिलीपासून ते ओझे त्यांच्या डोक्यावर नको,' अशी पालक-शिक्षकांची अत्यंत साधी मागणी होती. मात्र, त्यावरून रण माजले. 'हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' असे युक्तिवाद झाले. 'हिंदी विरुद्ध मराठी' असे चित्र रंगवून झाले आणि नेत्यांची मुले कोणत्या शाळेत शिकतात, याचेही उत्खनन झाले. त्यामुळे हा विषय भाषिक अस्मितेच्या मार्गाने निवडणुकीच्या आखाड्यात आला. प्रारंभी वीस विद्यार्थ्यांच्या किमान अटीवर अन्य भाषा शिकण्याचे स्वातंत्र्य देण्याची तयारी दर्शवून हिंदीसक्ती रद्द केल्याचे भासवण्याचा प्रयत्न झाला; पण ही मागच्या दाराने हिंदीसक्तीच असल्याने विरोधाची धार तीव्र झाली. नंतर हिंदीचे मौखिक शिक्षण देण्यातून एक पाऊल मागे घेण्याचाही प्रयत्न झाला. अखेरीस मुदत नसलेल्या तज्ज्ञ समितीकडे पाठवून हा विषय थंड्या बस्त्यात गेला.

# अहो मुलगी ही आधार बनु शकते ना !

आज काल प्रत्येकाचा हट्ट असतो मला मुलगा पाहिजे कारण संपत्तीला वारस आणि आपल्या म्हातार पणात तो आपला आधार होईल हिच अपेक्षा आई - वडिलांची असते ती असणही स्वाभाविक आहे यामुळे मुलींचे भ्रूणहत्या होते कडक कायदा असला तरि गुपचुप चोरून चपाटून मुलींचा गर्भ काढल्या जातो मग ज्याला एक किंवा दोन किंवा तीन अन चार मुले असतील तर ते म्हातारा - म्हातारी खुपच सुखात आनंदात पाहिजे पण हल्ली काळात चित्र फारच विचित्र पाहायला मिळते आई एकात तर वडिल दुसऱ्यात काही ठिकाणी तर चक्क म्हातारा - म्हातारी दोघेच वेगळे राहतात मग कसला आधार अन कोठे आधार समजदार नागरिकाने बागबान हा हिंदी चित्रपट नक्की पहावा म्हणजे कळेल काय करावे अन काय नाही
वटारलेले डोळे पाहून दबणारी बायकोच, आता डोळे वटारून पाहू लागली की समजून घ्यावे कि, " इहलोकातील आपले अवतारकार्य शेवटच्या टप्यात आहे. "
कमावत्या मुलांच्या आवाजात कडकपणा आला; तर समजून घ्यावे कि, आपण आता कौटूंबीक जबाबदारीतून हळूहळू अंग काढून घ्यावे.
बसल्या बसल्या ह्या शेंगातील दाणे काढा ,असे जेव्हा सुनबाईने म्हटले तर समजून घ्यावे की, बॉस नावाचे पद यांनी खारीज केले आहे.
वय वर्ष 60 नंतर कुणी आपल्याशी चांगले वागेल ही अपेक्षा ठेवु नका.
भाऊबंदकीचे नाते कुटूंबाच्या फाळणी बरोबरच संपुष्टात आले, नातेवाईक देणे / घेणे वादातून संपले,
पत्नीचा ओढा नकळत न टिकणाऱ्या मुलांच्या नात्याकडे वळू लागला
कार्यप्रसंगात नातेवाईक भेटतात, केवळ रामराम होतो, फारसी चौकशी होत नाही, तुम्ही मात्र मनात उजळणी करत असता, ह्याला मी किती मदत केली होती...
सगळे कटू अनुभव जमा झाले असतील, कुणी नाही कुणाचे हा अनुभव गर्द झाला असेल.
नाती बिघडली, सबंध बिघडले, वाट्याला एकटेपण आले, आता कुणाचे फोन येत नाहीत, दुखावलेले मन कुणाला फोन कर असेही म्हणत नाही.
तरीपण एक नातं अजून टिकलं आहे, एक फोन चालु आहे, ते नातं मुलीचं तितक्यात मुलीचा फोन येतो , ती विचारते--- " पप्पा गेले होते का दवाखान्यात ? औषधं घेतलीत का ? काय म्हणाले डॉक्टर ? जेवण झाल काय ?"



अनेक प्रश्न काळजीचे, आस्थेचं विचारणं, जिव्हाळ्याचे हेच एकमेव नात उरतं...
थोडा पश्चातापही होत असतो , मुलींसाठी काहीतरी करण्यात मी कमी पडलो, त्यांच्यासाठी काहीतरी करायचे राहून गेले, कसे होणार त्यांचे ?
लोक मुलगा झाला कि, स्वतःला भाग्यवंत समजतात, मला असे वाटते ,ज्यांना मुली आहेत ते खरे भाग्यवंत होय.
एरवी दोन तीन मुले जेव्हा वडिलांना कुणाकडे ठेवावे, यावरुन भांडत असतात तेव्हा झालेली चूक सुधारण्या पलीकडे गेलेली असते. तेव्हा मुलगी म्हणते, " बाबा काळजी करू नका मी आहे ना !!...." म्हणून सांगावेसे वाटते कि जर मुलगी सुशिक्षित , सुजान , समजदार , संस्कारी असेल तर मुलगीही आई - वडिलांचा चांगला आधार होऊ शकते असे मला वाटते .

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40

## वडिल .. ?

वडिलांचं मोठेपण गेल्यावर कळतं
तसं ते अनाकलनीय मिश्रण असतं
आईची शिकवण संस्कार देतं
बापामुळे जगायला बळ मिळतं
कळतं,दिसतं पण वडील कधीही
नाही करू शकत दुःखाचे प्रदर्शन
सामोरे जाणे,आतल्या आत सदा
सहन करणे हेच त्यांचं दर्शन
काळजाचा तुकड्याची पाठवणी
करताना हा हळूच अश्रू पुसतो
घरात आलेल्या नव वधूला
हाच खरा खुरा आधार वाटतो
बाप,वडील,पिता, बाबा
असं कुणीही काही म्हणा
पण कुटुंबाच्या सुखासाठी
तेच असतात पाठीचा कणा

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40

# तुमच्या माझ्या मनाचे औषध:- श्रीमद् भगवद्गीता



रिमझिम पाऊस मस्त सुरू सगळीकडे! थंडगार वारा सोबतीला... 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे गाणे गुणगुणत सकाळी सकाळी AOL केंद्रावर गेलो.सुदर्शन क्रिया झाल्यानंतर नेहमीसारखी गीता साथीला आली.. सातवा अध्याय सुरू केला.आजचे श्लोक भारी, मस्तच! श्लोक सांगतो आणि तुमच्या आमच्या मनाला ते कसे छान औषध पुरवतात, ते तुमचे तुम्हीच पाहा!

श्रीभगवानुवाच:-
मय्यासक्तमना:पार्थ योगंयुञ्जन्मदाश्रयः।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छ्रुणु।।१।।
ज्ञानं तेऽहंसविज्ञानंमिदंवक्ष्याम्यशेषतः।
यज्ज्ञात्वा नेह भूयोन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।।२।।

अर्जुन हा तुमचा आमचा प्रतिनिधी.काहीसा confuse झालेला. आणि कृष्ण म्हणजे ठाम उत्तर! सर्वकालिक आणि निश्चित असे!

गोंधळलेल्या अर्जुनाला एकाग्र करण्याचा मानसिक प्रयोग या श्लोकात कृष्णाने केला. डॉक्टरकडे गेल्यावर प्रथम जसे डॉक्टर म्हणतो, "तू सारे माझ्यावर सोडून दे आणि आराम कर."तसेच कृष्ण या श्लोकात म्हणतो की," माझ्या ठिकाणी एकाग्र मन कर.मला जोडलेला राहा.माझा आश्रय कर. आणि समग्रतेने मला तू जसा जाणशील, तसे मी तुला उत्तर देईन. मग तुला मी विज्ञानासहित हातचे राखून न ठेवता सारे ज्ञान देईन. आणि मी भरभरून दिलेल्या ज्ञानानंतर जाणण्याजोगं काही उरतच नाही."

हा झाला सरळ अर्थ.आपल्यासाठी याचा उपयोग काय? तर कृष्ण म्हणजे निव्वळ महाभारत युद्धातील व्यक्ती असे न समजता हे लक्षात घ्यावे, की कृष्ण म्हणजे या नावाची व्यक्ती निर्माण होण्यापूर्वी साऱ्या universe मधून सर्वकाळ असणारी, एकवटत गेलेली आणि वसुदेव देवकीच्या पुत्ररूपात प्रकट झालेली सार्वकालिक दिव्यता. मनुष्याच्याअंतरंगात असलेल्या दिव्यतेच्या दिवा पेटवण्याच्या प्रवासाला आधार देणारी दिव्यता!

हा दिव्यतेचा प्रवास मनातून होत असतो. मनाला तेवढे बलशाली, प्रभावी करण्याशिवाय उपाय नाही! आणि मनाला आपण एकटेच एकट्याच्या भरवश्यावर नाही उभे करू शकत! हे जग अज्ञाताच्या आधारावर चालते.अचूक चालते! त्या अज्ञाताचा आधार घेण्याची सवय मनाला लावावी.तो अज्ञात आधार म्हणजेच श्रीकृष्ण! आणि आधार घेणारी तुमच्या आमच्यातली व्यक्ती म्हणजेच अर्जुन! ह्या अनंत अनंत पसरलेल्या विश्वाच्या पसाऱ्याला अचूकपणे चालवणारं असं काहीतरी या जगात निश्चित आहे. आपल्या समाधानासाठी त्या अज्ञात विराटाला कृष्ण म्हणता येईल.

जसे एखादे गणित सोडवताना 'समजा याची किंमत X आहे', असे आपण गृहीत धरतो आणि ते सोडवत सोडवत शेवटी X= संबंधित उत्तर,असा आपला प्रवास होतो.X हे केवळ आधार म्हणून आधी समजूत करून शोधत जाण्यासाठी घेतलेले प्रतीक आहे. तसाच परमेश्वराचा फोटो, मूर्ती हे X सारखे आधार म्हणून घेतलेले प्रतीकच आहे. त्यातून स्वतःच्या मनाला शोधता शोधता आपल्या स्वतःमध्ये असलेली दिव्यता सापडते. तिलाच आपण परमेश्वराचे दर्शन म्हणतो. हे शोधण्यासाठी त्या अज्ञाताचा आधार घ्यावा,म्हणजे तो आपल्याला वेळोवेळी ज्ञान देत राहतो. त्या अज्ञाताशी जोडलेले राहून प्राणीसुद्धा न शिकवता पोहतात. वाघ सुद्धा पोटदुखीच्या वेळी गवत खातो. हे कोणी डॉक्टर त्याला सांगत नसतं. भूकंपाच्या वेळी प्राणी प्रतिक्रिया देतात,पूर्वसूचना देतात. हे अज्ञाताशी असलेली कनेक्शन आपणही पुन्हा जोडले तर आपलाही सांभाळ अज्ञानातून बरोबर होतो.

आपल्या पद्धतीने जगण्याचा आधार देणाऱ्या त्या अज्ञाताला X Factor म्हणायचे का? त्याऐवजी श्रीकृष्ण असे म्हटले तर? त्या अज्ञाताचा आधार आपल्याला घेण्याचा रस्ता भगवद्गीता दाखवते. वरील श्लोकाचा आणखी अर्थ चिंतन करत राहिले, की सापडेल!
जय श्री कृष्ण!
©श्रीनिवास राघवेंद्र जोशी कारंजा, जिल्हा वाशीम

# श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी च्या वतीने पुन्हा गुणवंत गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनीना सायकल वितरण.

**संजय महाजन: दै.विश्वजगत**

शिर्डी -श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी च्या वतीने शिर्डी शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या गुणवंत गरजू विद्यार्थी/ विद्यार्थिनींना आज दि. २९ जून २०२५ रोजी सायकल वाटप करण्यात आले. ट्रस्ट चे अध्यक्ष अरुणराव शिंदे-गायकवाड पा.यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी सौ. संगीता गायकवाड पा. श्री. साईराज अरुणराव गायकवाड पा. व सहपरिवार तसेच रमेश गोंदकर पाटील जिल्हा उपाध्यक्ष- अहिल्यानगर - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,संग्राम कोते पाटील ,प्रदेश सरचिटणीस- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,दीपक गोंदकर पाटील शिर्डी शहर अध्यक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,निलेश शिंदे पाटील युवक अध्यक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,सचिन सोपान गोंदकर पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी , शंतनू सुगवेकर माजी क्रिकेटपटू अनिल वाल्हेकर माजी क्रिकेटपटू,खंडोबा मंदिर चे अध्यक्ष संदीप नागरे, शिव छत्रपती प्रतिष्ठान चे अध्यक्ष अशोक भाऊसाहेब गायके पा. शिवा गोंदकर पाटील- उद्योजक अभिजीत गोंदकर ,पाटील- उद्योजक अजित जगताप पा.,राहुल फुंडे ,संकेत बोराडे ,अमोल सुपेकर , गंगाधर वाघ,आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी ट्रस्ट च्या कार्याचे भरभरून कौतुक केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शिक्षणसाठी होणारी गैरसोय दूर केल्याने पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हिचं आमच्या कामाची पोहच पावती आहे. शैक्षणिक कामासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना आमच्या ट्रस्ट चे नेहमीच सहकार्य राहील असे ट्रस्ट चे अध्यक्ष श्री अरुणराव शिंदे-गायकवाड पा. यांनी बोलताना सांगितले.




## साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे कर्मचारी भाऊसाहेब बाराहाते सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार व पुढील वाटचालीस शुभेच्छा

**संजय महाजन: दै.विश्वजगत**

शिर्डी - शिर्डी साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे कर्मचारी भाऊसाहेब बाराहाते सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व साई संस्थान एम्पलॉइज सोसायटीचे चेअरमन विठ्ठलराव पवार व व्हाईस चेअरमन पोपटराव कोते व संचालक मंडळ यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी सत्कार करताना सचिव विलासराव वाणी सहसचिव बाबासाहेब अनार्थे संभाजी राजे कोते व आप्पासाहेब टेकाडे उदय पाटील पाराजी वैद्य निखिल चौधरी सामाजिक कार्यकर्ते ठकाजी काटकर किसनराव निकम राहुल डांगे ज्ञानेश्वर खरात नवनाथ वाघे मंगेश कुलकर्णी व विजय शिंदे बाळासाहेब काटकर व पत्रकार संजय महाजन व सोसायटी कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# पर्यावरण संरक्षणासाठी कृषी दूतांचा पुढाकार; वृक्ष लागवड आणि कृषी दिन साजरा

**प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत**

गिरोली खुर्द - डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्न समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगाव राजा येथिल चौथ्या वर्षात शिकत असलेल्या मुलांनी कृषी दिनाच्या निमित्ताने गावात कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर गावातून कृषी दिंडी काढण्यात आली व वृक्षारोपणाचा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक कृषी अधिकारी श्री. डी. एम. शिंगणे सर यांनी उपस्थित राहून गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. गावाचे सरपंच यांनी कृषी दिनाचे महत्त्व स्पष्ट करून गावकऱ्यांसह विद्यार्थ्यांना प्रेरणादायी माहिती दिली.

या कार्यक्रमात समर्थ कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक पवार सर व प्राध्यापक शेळके सर यांची विशेष उपस्थिती लाभली. जि. प. शाळा गिरोली खुर्द चे मुख्यध्यापक पवार सर, शिक्षक वाघ सर, यांनी कार्यक्रमास सक्रिय सहभाग दर्शवला व कार्यक्रमाचे आयोजन करण्यास मदत केली कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहत्रे सर व मोहजीतसिंग राजपूत सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



समर्थ कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी संकेत पांढरे यांनी सूत्रसंचालन व वरद मोताळे यांनी आभारप्रदर्शन केले ,निखिल मुरकुटे, धनंजय मनेरी ,ऋतुराज मिटकरी, ओमकार पाटील, भागवत कोल्हे, जयेश मोरे, ऋषिकेश नाष्टे, सौरभ ओइंबे, उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी पार पाडला. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सकारात्मक प्रतिसाद दिला.







VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213
विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटिंग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

महत्त्वाचे



## विदर्भातील नऊ जिल्ह्यांत पावसाची मोठी तूट:नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक 44% कमी पाऊस

**प्रतिनिधी : दैनिक विश्वजगत**

नागपूर : राज्यातील बहुतांश भागात दमदार पावसाने हजेरी लावली असली तरी विदर्भतील अनेक जिल्ह्यात अद्यापही दमदार पावसाने पाठ फिरवली असल्याचे चित्र आहे. नागपूर प्रादेशिक विभागाने दिलेल्या माहितीनुसार गेल्या १ जून ते ३० जून या कालावधीत विदर्भातील ९ जिल्ह्यांमध्ये जून महिन्याच्या सरासरी पावसापेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यात फक्त बुलढाणा आणि वाशिम या दोनच जिल्ह्यात जून महिन्याची सरासरी ओलांडली गेली आहे.१ ते ३० जून या कालावधीत विदर्भात एकूण १७५ मिलिमीटर पावसाची नोंद होते. मात्र यंदा केवळ १५५ मिलिमीटर पावसाचीच नोंद झाली आहे. त्यातल्या त्यात सर्वात कमी पाऊस नागपूर जिल्ह्यात झाला असून सरासरी १७३ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त ९८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच पावसाची तूट ४४% इतकी आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भंडारा जिल्ह्यात १८७ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त १११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. म्हणजेच ही पावसाची तूट ४०% इतकी आहे. अमरावती जिल्ह्यात १५० मिलिमीटर पावसाच्या तुलनेत फक्त १०० मिलिमीटर पाऊस झाला आहे. म्हणजे पावसाची तूट झाली आहे ३३% गोंदिया जिल्ह्यात १९६ मिलिमीटर सरासरी पावसाच्या तुलनेत फक्त १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. इथे पावसाची तूट ३०% आहे. वर्धा जिल्ह्यात १७० मिलिमीटर पावसाच्या तुलनेत १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि अकोला या चार जिल्ह्यात पाऊस समाधानकारक झाला असून पावसाची तूट अत्यंत नगण्य आहे.

# वाढीव मोबदला मिळविण्यासाठी मदत करावी, अशा मागणीचे माजी केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे निवेदन

**अजय टप : दैनिक विश्वजगत**



मलकापूर : छत्रपती शिवराय प्रतिष्ठाण मलकापूर यांची राष्ट्रीय महामार्ग क्र.६ मध्ये जमीन गेली असून या १५०० चौ.मी. जमिनीचा वाढीव मोबदला २०२४ पासून केंद्र सरकारकडून मिळाला नसल्याने या बहुजन समाजाच्या प्रतिष्ठानची अनेक कामे अडगडीत पडली आहेत. यामुळे आपण केंद्र सरकारकडून तो वाढीव मोबदला मिळविण्यासाठी मदत करावी, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक अध्यक्ष, माजी केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे छत्रपती शिवराय प्रतिष्ठानचे संचालक व शिष्टमंडळाने ३० जून रोजी मुंबई येथे भेट घेवून दिले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते श्रीराम पाटील, छत्रपती शिवराय प्रतिष्ठानचे सचिव अॅड.साहेबराव मोरे, संचालक प्रकाश पाटील, ज्ञानदेवराव हिवाळे, इंजि.सचिन तायडे, उद्योजक इंजि.सौ. कोमलताई सचिन तायडे आदींनी ३० जून रोजी शरदचंद्र पवार यांची वायबी सेंटर मुंबई येथे भेट घेत छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या मंगल कार्यालयाच्या कार्याची माहिती दिली.

यावेळी गेल्या १० वर्षापासून बहुजन समाजासाठी छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने कार्य सुरू असून अतिशय कमी व माफक दरात गोरगरीब नागरिकांच्या मुला-मुलींचे लग्न, विविध सामाजिक कार्य, उपक्रमे या मंगल कार्यालयात साजरे करण्यात येतात. छत्रपती शिवराय प्रतिष्ठाची १५०० चौ.मी. जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र.६ मध्ये गेली असून सुरूवातीची माफक नुकसान भरपाई मिळाल्यानंतर आर्बिट्रेशन बुलढाणा यांचेकडे अपिल दाखल करून त्याचा निकाल २४ एप्रिल २०२४ रोजी होवूनही ती नुकसान भरपाईची रक्कम वाढवून देण्यात आली. मात्र या निकालाला तब्बल १ वर्षाच्यावर कालावधी उलटल्यानंतरही केंद्र सरकारकडून या नुकसान भरपाईची वाढीव रक्कम अद्यापही देण्यात आली नाही. सद्यस्थितीत छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या या इमारतीची अनेक कामे बाकी आहेत. तिसऱ्या मजल्यावरील १६ खोल्यांचे काम अर्धवट पडले आहे. पैशांअभावी कामे रखडली असल्याने केंद्र सरकारकडून मिळणारा वाढीव नुकसान भरपाई तात्काळ मिळणे गरजेचे असल्याने आपण याबाबत स्वत: लक्ष घालून ही रक्कम मिळवून द्यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने शरदचंद्र पवार यांचेकडे याबाबत सविस्तर माहिती देत केली आहे. यावेळी शरदचंद्र पवार यांनी उद्योजक सौ.कोमलताई सचिन तायडे यांच्या एस.के.स्क्वेअर एंटरप्राईजेसच्या कामाचीही माहिती घेत तरूणांनी हातांना रोजगार मिळेल असे उद्योग करणे गरजेचे असल्याचे सांगत सौ.कोमलताई तायडे यांच्या या उद्योगाचे कौतुक करीत आपण नेहमीच अशा तरूणांच्या पाठीशी उभे असल्याचे त्यांनी सांगितले.

तर यावेळी शिष्ट मंडळाने संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे यांचीही भेट घेतली. यावेळी शरदचंद्र पवार व खा.सुप्रियाताई सुळे यांनी छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या उद्घाटन समारंभास नक्कीच येवू असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

### या अॅड.मोरे.. पवार साहेबांचा आवाज ऐकताच सर्वजण आवाक

शरदचंद्र पवार साहेब आपल्या जुन्या कार्यकर्ते व नेत्यांना अजूनही नावाने ओळखतात. याबाबत आपण अनेकदा ऐकले आहे. याची प्रचिती या शिष्टमंडळाला आली. अॅड.साहेबराव मोरे यांनी तब्बल १५ ते १७ वर्षांनी शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. यावेळी सभागृहात शिष्टमंडळाने प्रवेश करताच पवार साहेबांनी 'या अॅड.मोरे अशी हाक मारताच सर्व जण आवाक झाले.' यावेळी शरदचंद्र पवार यांनी अॅड. साहेबराव मोरे यांच्या सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच अॅड.साहेबराव मोरे यांनी इंजि. सौ.कोमलताई सचिन तायडे यांचा परिचय करून देत त्यांच्या उद्योगाची माहिती पवार साहेबांना दिली असता पवार साहेब यांनी त्या करीत असलेल्या उद्योगाची माहिती जाणून घेत एवढ्या मोठ्या प्रमाणात महिलांना रोजगार मिळवून दिल्याबद्दल सौ.कोमलताई तायडे यांचे कौतुक करीत अशा धाडसी तरूणांच्या पाठीशी आपण कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

# सोनोशी जिल्हा परिषद सर्कल मध्ये आमदार मनोज कायंदेनी केला खेड्यापाड्यात दौरा

## सोनोशी जिल्हा परिषद मधून नितीन शेळके पाटील यांची तयारी सर्कलमध्ये जोरदार चर्चा

**अनिल दराडे : दैनिक विश्वजगत**



सिंदखेडराजा - सिंदखेड राजा तालुक्यातील सोनोशी जिल्हा परिषद सर्कलमध्ये आमदार मनोज कायंदे यांनी कार्यत्यांच्या भेटी व समस्या घेतल्या जाणून व सात्वनपर भेटी दिल्या धांदरवाडी, भोसा, माघील महिन्यात शेलू येथील सखाराम एखंडे व हरिचंद्र एखंडे यांचे दुखत निधन झाले होते त्यांच्या कुटुंबायांना आमदार मनोज कायंदे नी भेटी दिल्या चिंचोली, वर्दडी अनेक गावामध्ये नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या या भागात कायंदे यांचा मोठा चाहता वर्ग आहे ते आमदार झाल्यानंतर पहिल्यांदा सर्कल मध्ये त्यांनी दौरा केला असून त्यांनी कार्यक्त्यांना सांगितले की तुमचे कोणतेही काम असू द्या माझ्याशी संपर्क साधा यावेळी जनतेची काळजी घेणारा आमदार मनोज कायंदे हा तुमच्या पाठीशी ठाम पणे उभा आहे नव्याने प्रवेश झालेल्या राष्ट्रवादी (शरद पवार गटाचे) नेते तथा सरपंच नितीन शेळके पाटील यांचा पुण्यात एका कार्यक्रमात आ मनोज कायंदे व जिल्हाध्यक्ष ऍ नाझेर काजी साहेब यांच्या नेतृत्वा वर विश्वास ठेवून अजित पवार गटात प्रवेश घेतला असून आता ते मनोज कायंदे यांच्या खांध्याला खांदा लावून मतदारसंघात काम करण्याचे असले सांगितले शेळके यांनी म्हंटले की गाव तेथे शाखा घर तेथे कार्यकर्ता तयार काम खेड्यापाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा झेंडा व शाखा तयार करू आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समित्या निवडणुकात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही या पुढे दौरे करून आढावा घेणार आहोत त्यातच सर्कलमध्ये दौरा केल्यानांतर जनतेकडून सोनोशी जिल्हा परिषद सर्कलमधून नितीन शेळके पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा ऐकायला मिळत आहे शेळके म्हणाले की पक्षाचे अध्यक्ष आदरणीय अजित दादा पवार साहेब व आमदार मनोज कायंदे जिल्हाध्यक्ष काझी साहेब यांनी संधी दिल्या जीवाचं रान करून सोनोशी जिल्हा परिषद सर्कल वर राष्ट्रवादी चा झेंडा फडकवून दाखवू हजारोच्या मताने विजयी होऊ आमदार मनोज कायंदे सोबत, युवा नेते नितीन शेळके पाटील, विजय कुहिरे पाटील, वशीम शेख,युवा नेता रामेश्वर एखंडे पाटील यांच्या सह अनेक कार्यकर्ते दौरा सोबत होते



## हरित क्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांना आडगाव राजा ग्रामपंचायतीकडून अभिवादन!

**अनिल दराडे : दैनिक विश्वजगत**

सिंदखेडराजा - कृषी क्रांतीचे प्रवर्तक; त्यांच्या दूरदृष्टीने महाराष्ट्राला मिळाली हरित समृद्धीची दिशा सिंदखेडराजा अनिल दराडे महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे, कृषी क्षेत्रात ऐतिहासिक बदल घडवणारे, राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत आडगाव राजा येथे कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमात वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या दूरदृष्टीने घडवलेल्या कार्याची आठवण करत ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये सरपंच संतोष चव्हाण, उपसरपंच अशोक कहाळे, माजी सरपंच पिराजी महाराज, रामदास कहाळे, रुस्तुमरव झोरे हे प्रमुख उपस्थित होते. यावेळी अर्जुन चव्हाण, गैबी राठोड, मुरलीधर वाघमारे, निलेश शिनगारे (पोलीस पाटील), सदाशिव चव्हाण, ध्न्यानेश्वर चव्हाण, निवृत्ती राजे जाधव, गोविंद चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी नागोराव फुले व गजानन आहेरकर यांचीही उपस्थिती लाभली.

गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत हा कार्यक्रम यशस्वी केला. वसंतराव नाईक यांचे कृषी क्षेत्रातील मोलाचे योगदान: हरित क्रांती घडवून भारताला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनवले सिंचन योजना, सुलभ खत-कीडनाशके, व शेतकऱ्यांसाठी धोरणात्मक निर्णय शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सकारात्मक उपाय योजना आदिवासी व मागास भागातील शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम राबवले कृषी विद्यापीठ, संशोधन आणि प्रशिक्षणासाठी मजबूत पायाभरणी आजच्या पिढीच्या शेतकऱ्यांसाठी वसंतराव नाईक हे प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांच्यामुळेच महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात यशस्वी परिवर्तन घडवले. गावकऱ्यांनी "शाश्वत शेतीसाठी शाश्वत विचारांची गरज" असा संदेश देत त्यांना वाकून अभिवादन केले.

## नळदुर्ग महाविदयालयातील प्रा.डॉ. उध्दव भाले यांना संशोधनातील भारतीय पेटंट

**सुहास येडगे: दै.विश्वजगत**

नळदुर्ग - येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील बनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. उध्दव भाले यांना वनसपतीच्या मुळावर असणाऱ्या मायकोरायझा नावाच्या बुरशी ह्या शेतीसाठी विशेषतः उत्पादन वाढीसाठी कशा उपयुक्त असू शकतात याबर आधारीत "मातीतून पोर्टेबल मायकोरायझल बुरशी शोधणारे उपकरण" हे भारतीय पेटंट नुकतेच मिळाले आहे. आपल्या शेतातील काही बुरशी ह्या शेतीसाठी किती महत्वाच्या असतात अशा



अनुशंगाचे संशोधन डॉ भाले हे सातत्याने करीत असतात, त्यांचे आतापर्यंत १७० पेक्षा जास्त शोध निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झालेले आहेत. सत्तर पेक्षा जास्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात त्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत १२ विद्यार्थ्यांनी पीएच. डी.पदवी संपादन केली आहे आणि सद्या ७ विद्यार्थ्यांचे संशोधन चालू आहे. त्याचबरोबर त्यानी युजीसी, डीएसटी चे प्रकल्पही पूर्ण केलेले आहेत. त्यांचे संशोधन हे पिकावरील पडणाऱ्या रोगांचे एकात्मिक पद्धतीने निमूर्लन आणि पिकांची सेंद्रीय पद्धतीने वाढ होऊन उत्पादन क्षमता कशी वाढली पाहिजे यावर आधारीतआहे. त्यांच्या या संशोधनामुळे २०२२-२३ पासून सातत्याने मागील तीन वर्षापासून जागतिक शास्त्रज्ञाच्या यादीतही त्यांना नामांकन प्राप्त झालेले आहे. त्याच संशोधनाच्या आधारावरील हे भारतीय पेटंट मिळाले आहे. हे पेटंट वनस्पतीशास्त्र विभाग कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग आणि चन्नाबश्वेश्वर फॉर्मसी महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ( एमओयु) अंतर्गत प्रा डॉ उध्दव भाले आणि प्रा डॉ ओमप्रकाश भुसनुरे यांच्या सहयोगाने पूर्ण झालेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, कार्यालयीन अधिक्षक श्री. धनंजय पाटील आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने त्यांचा महाविद्यालयात सत्कारही करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मा. मधुकररावजी चव्हाण, सचिव मा. उल्हास बोरगांवकर आणि संस्थेच्या सर्व संचालकानी व गावातील नागरिकांनी अभिनंदन केले.

# शहापूर ग्रामपंचायत चा अनोखा उपक्रम जि प शाळेत प्रवेश घेणाराचा करणार घर टेक्स माफ

**लक्ष्मीताई वाडेकर: दै.विश्वजगत**



खामगाव- खामगाव पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या मोदी शहापूर ग्रामपंचायत चा एक अनोखा ठराव पारित करण्यात आला आहे, ज्या पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेमध्ये घेतला असेल अशा सर्व पाल्याच्या पालकांचा ग्रामपंचायत चा घर टॅक्स पाणीपट्टी घरपट्टी माफ करण्यात येणार असल्याचा ठराव शहापूर ग्रामपंचायत ने घेतला, या निर्णयाने असे लक्षात आले की ग्रामपंचायतीने शैक्षणिक क्षेत्रासाठी एक अनोखे पाऊल उचलले आहे, 2025 ते 26 या कार्यकाळात वर्ग एक ते सात पर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला त्यांच्या घर टॅक्स पूर्णपणे माफ करण्यात येईल असं ठरावच शहापूर ग्रामपंचायत यांनी घेतला, ग्रामपंचायतचे या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळेमधील प्रवेश वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही शाळा समितीचे अध्यक्ष, शीलवंत भीमराव बावस्कर, उपाध्यक्ष गणेश भुसारी, मुख्याध्यापक एस आर सोळंके, यांचा मुख्य सहभाग आहे, व ग्रामपंचायत सरपंच, सौ सरस्वती मनोहर बदरखे उपसरपंच, शीलवंत दादाराव गवई, ग्रामपंचायत चे सर्व सदस्य व ग्राम अधिकारी, सौ राठोड मॅडम, यांनी या अनोख्या उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले, शाळा समितीच्या शिफारशीनुसार तात्काळ ठराव मंजूर करण्यात आला, जिल्हा परिषद शाळेच्या विषयी शैक्षणिक वातावरण आणि सकारात्मक ऊर्जा लोकांच्या मनामध्ये निर्माण झाली, आणि जिल्हा परिषद शाळा प्रति लोकांचा विश्वास वाढला व जिल्हा परिषद शाळेमध्ये आपल्या पाल्याला नक्कीच प्रवेश द्यावा अशी इच्छा सर्व गावकऱ्यांची झालेली दिसून येत आहे, आणि सर्व पालकांनी या शैक्षणिक विकासामध्ये आणि शैक्षणिक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा असे आव्हान ग्राम अधिकारी राठोड मॅडम यांनी केले आहे

## महादेव लोखंडे किट्समधून सेवानिवृत

रामटेक :ग्रंथालय शिपाई श्री महादेव लोखंडे कविकुलगुरू इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी अँड सायन्स मधून 30 जून 2025 ला सेवानिवृत झाले. महादेव लोखंडे यानी किट्स मध्ये 35 वर्षे सेवा केली. त्यांचा सेवानिवृती निमित्त प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला. या वेळी प्रामुख्याने सहायक ग्रंथपाल एन. चंद्रारेड्डी, डॉ विलास महात्मे,डॉ अनंत दाभाडे, डॉ. पंकज आष्टणकर, डॉ. शिवप्रसाद, सहित आदि कर्मचारी उपस्थित होते

# नळदुर्ग येथे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात

**सुहास येडगे: दै.विश्वजगत**





नळदुर्ग - हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती नळदुर्ग येथे विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली . नळदुर्ग येथील वसंतराव नाईक गोलाई चौकात नियोजित वसंतराव नाईक स्मारकाच्या ठिकाणी हरित क्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त बंजारा समाज बांधवांच्या वतीने अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रारंभी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून शांततेचे प्रतीक असलेल्या पांढऱ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले . याप्रसंगी भाजपाचे युवा नेते मल्हार दादा पाटील यांनी यांनीही उपस्थित मान्यवरांच्या समवेत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले तसेच काँग्रेसचे नेते धिरज पाटील यांनीही वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले येथील वसंतनगर येथे स्वर्गीय वसंतराव नाईक याच्या जयंतीचे औचित्य साधून वसंतराव नाईक जयंती उत्सव कमिटीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रकाश चव्हाण यांनी केले . तर भाजपाचे युवा नेते मल्हार पाटील यांनी देखील रक्तदान शिबिरास भेटी देऊन कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले . यावेळी प्रकाश चव्हाण , भाजपाचे दिपक आलूरे , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अँड आशिष सोनटक्के , भाजपाचे दत्ता राजमाने , तांडा समृद्धी योजनेचे अशासकीय सदस्य विलास राठोड, प्रविण पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे हरीष जाधव , आश्रम शाळेचे अध्यक्ष वैभव जाधव, कैलास चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण , वसंत पवार, शिवाजी चव्हाण , मोतीराम राठोड एम पी राठोड , महेश चव्हाण, जयंती कमिटीचे अध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, सचिव दत्ता राठोड, कार्याध्यक्ष सुरेश राठोड, कोषाध्यक्ष सचिन राठोड, मिरवणूक प्रमुख सुशील राठोड, रवि महाराज, माजी नगरसेविका छिमाबाई राठोड, भाजपाचे धिमाजी घुगे , साहेबराव घुगे , पद्माकर घोडके , श्रमिक पोद्दार , पाडूरंग पुदाले , रिपाईचे एस के गायकवाड , गणेश राठोड , अमरजीत पवार विष्णू जाधव सह बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .

महत्त्वाचे

## वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार



अनिल वेटे: दै.विश्वजगत

रामटेक :- वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार झाल्याची घटना घडली आहे. जंगलात चरण्यासाठी जनावरे घेऊन गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला केला. ही घटना (दि.३०) रामटेक तालुक्यातील देवलापार बिटातील करवाई राउंड क्र. ४७४ परिसरात घडली. बालकराम कृष्णा ढोबळे (वय ६०) रा. लोधा असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार झाल्याचे वृत्ताने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. माहितीनुसार, लोधा गावातील रहिवासी बालकराम कृष्णा ढोबळे हे सोमवारी सकाळी ११ वाजता देवलापर बीट अंतर्गत करवाई राउंडच्या बीट क्रमांक ४७४ मध्ये त्यांची गुरे चरण्यासाठी गेले होते.

संध्याकाळनंतर गुरे घरी पोहोचली तरी गुराखी घरी पोहोचला नाही, त्यामुळे कुटुंबीयांनी देवलापर पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. मंगळवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास बीट क्रमांक ४७५ मध्ये गुराखीच्या विद्रूप मृतदेह आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच आरएफओ आर. डोंगरे त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मृतदेहाचा पंचनामा केला.

आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी देवलापर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. वनविभाग आणि देवलापर पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# शिर्डी च्या वतीने पंधरावे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व मोफत चष्मा वाटप शिबिर यशस्वीरित्या संपन्न- नेत्रसेवा हीच साईसेवा

संजय महाजन: दैनिक विश्वजगत

शिर्डी-श्री साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नविन पनवेल मुंबई यांच्या सौजन्याने दिनांक 29 जून 2025 रोजी पंधरावे मोफत नेत्र तपासणी मोफत चष्मा वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर साई9 ग्रुप कार्यालय शेजारील अयोध्या हॉस्पिटलच्या जागेत पिंपळवाडी रोड शिर्डी येथे पार पडले. यावेळी उपस्थित शंकरा आय हॉस्पिटल चे श्री विश्वनाथ पाटील व साई दृष्टी ऑप्टिकल चे श्री साई सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. 29 जून रोजी संपन्न झालेल्या शिबिरात जवळपास 1600 रुग्णांची मोफत तपासणी होऊन रूग्णांना मोफत चष्मा वाटप केले व 48 पेशंट ला मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी पनवेल येथे नेण्यात आले. शिर्डी शहर व परिसर तसेच, ठाणे,कल्याण, मालेगाव, अहिल्यानगर ,येवला, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी नाशिक,राहाता, कोपरगाव, धुळे आशा अनेक ठिकाणांहून आत्तापर्यंत 14650 पेक्षा जास्त गरजू व वयोवृद्ध रुग्णांनी शिबिरांचा लाभ घेतला.

आत्तापर्यंत 2050 पेशंट ची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शंकरा आय हॉस्पिटल पनवेल मुंबई येथे यशस्वीरित्या पार पडली. ट्रस्ट चे हे कार्य अल्पावधीतच भारतात नावारूपास आले असून ट्रस्ट च्या वतीने अशा प्रकारची सेवा ट्रस्ट च्या वतीने अविरतपणे सुरू राहील. पुढील २७ जुलै २०२५ रोजी होणाऱ्या १६व्या मोफत शिबीराचा लाभ देशातील अनेक गरजूंनी घ्यावा असे आवाहन ट्रस्ट चे अध्यक्ष श्री अरुणराव शिंदे- गायकवाड पाटील यांनी केले. ट्रस्ट च्या विश्वस्त सौ.संगीता गायकवाड पाटील व साई9 ग्रुप चे संचालक श्री साईराज गायकवाड पाटील यांच्या विशेष परिश्रमाने कार्यक्रम सुरळीत पार पडला. याप्रसंगी रमेश गोंदकर पाटील जिल्हा उपाध्यक्ष- अहिल्यानगर - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,संग्राम कोते पाटील ,प्रदेश सरचिटणीस- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,दीपक गोंदकर पाटील शिर्डी शहर अध्यक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,निलेश शिंदे पाटील युवक अध्यक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,सचिन सोपान गोंदकर पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी , शंतनू सुगवेकर माजी क्रिकेटपटू अनिल वाल्हेकर माजी क्रिकेटपटू,खंडोबा मंदिर चे अध्यक्ष संदीप नागरे, शिव छत्रपती प्रतिष्ठान चे अध्यक्ष अशोक भाऊसाहेब गायके पा. शिवा गोंदकर पाटील- उद्योजक अभिजीत गोंदकर ,पाटील-उद्योजक अजित जगताप पा.,राहुल फुंडे




,संकेत बोराडे ,अमोल सुपेकर , गंगाधरवाघ,आदीमान्यवरउपस्थितहोते. पुढील शिबिरासाठी नावनोंदणी करिता संपर्क: मो. 8055855445 / 7030035445

## अमळनेर येथील ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी विपश्यना साधनेच्या (Meditation)बाल आनापान सती या प्रशिक्षणाचे आयोजन

यदुवीर पाटील: दै.विश्वजगत



अमळनेर-ॲड. ललिता पाटील इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल येथील विद्यार्थ्यांसाठी इगतपुरी येथील विपश्यना व बाल आनापान समिती केंद्राला निमंत्रित करून विद्यार्थ्यांसाठी बाल आनापान सती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात विद्यार्थ्यांनी विपश्यना साधनेतील पहिल्या बाल आनापान सती या साधनेचे (Meditation) एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तीचा विकास व्हावा व त्यांना ध्यान साधनेची आवड लागून त्यांचे मानसिक स्वास्थ वृद्धिंगत व्हावे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असून दर दुसऱ्या आणि तिसऱ्या रविवारी एक दिवसाचे शिबिर घेण्यात येणार असून तालुक्यातील इतर इच्छुक विद्यार्थ्यांना देखील सामील होण्याची परवानगी आम्ही देणार असून त्यांना देखील याचा लाभ घेता येणार असल्याच्या माहिती प्राचार्य डॉ.नीरज चव्हाण यांनी दिली.या विपश्यना साधनेसाठी (Meditation) सेवा समितीचे जेष्ठ साधक श्री.विकास चौधरी सर व अन्य सदस्य उपस्थित राहून प्रशिक्षण देण्यात आले आणि विद्यार्थ्यांना ज्ञान साधने विषयी योग्य प्रकारे मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना ध्यान साधनेचे व मानसिक आरोग्याचे आणि मन:शांतीचे महत्त्व पटवून दिले. संस्था अध्यक्षा ॲड.ललित पाटील यांच्या सूचनांवर अमळनेर तालुक्यातील सर्व इयत्ता पाचवी पासून पुढील विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार असून सर्व इच्छुक पालकांनी आपल्या मुलांना बाल आनापान सतीच्या विपश्यना साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेकडे उत्स्फूर्तपणे नोंद करावी असे आव्हान संस्थेच्या व शाळेच्या वतीने सर्व पालकांना करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मानसिक शांती आणि ध्यान साधनेचा लाभ होईल त्याचबरोबर त्यांच्या स्मरणशक्तीचाही योग्य प्रकारे विकास होईल. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक , विद्यार्थी उपस्थित होते.

## पहाट फाउंडेशनचा आदर्श राज्यस्तरीय शिक्षिका पुरस्कार कु . स्नेहल सिध्दार्थ सरकटे यांना प्रदान !

प्रतिनिधी: दै.विश्वजगत




बुलढाणा- पर्यावरण संवर्धनासाठी व इतर सामाजिक कार्यासाठी सदा अग्रेसर असलेल्या पहाट फाउंडेशनच्या वतीने 2025 चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार कु .स्नेहल सिध्दार्थ सरकटे यांना दि 28 जून रोजी बुलढाणा येथील सामाजिक न्याय सभागृहामध्ये आयोजित पर्यावरण संवर्धन परिषद मध्ये प्रदान करण्यात आला .

तेरा वर्षापासून त्या पवित्र ज्ञानदानाच कार्य करत आहेत विद्यार्थ्यांना मदत करणे स्वखर्चाने मुलांचे वाढदिवस साजरा करणे ' वृक्षारोपण ' स्वच्छता . महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करणे ' मुलांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षेचा आयोजन करणे आधी कार्य शिक्षिका कु. स्नेहल सरकटे करत आले आहेत .सुद्धा मोताळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ येथे सहायक अध्यापक पदावर कार्यरत आहेत , महाराष्ट्रभरातून तब्बल 28 जणांना राज्यस्तरीय पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला ' या पुरस्कार सोहळ्याला रत्नागिरी बीड छत्रपती संभाजीनगर ' जळगाव खान्देश . जालना ' सोलापूर ' आधी विविध जिल्ह्यातून पुरस्कारार्थी आले होते ' यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका म्हणून कुमारी स्नेहल सरकटे यांना पुरस्कार देण्यात आला हे विशेष ' या अगोदरही कु . स्नेहल सरकटे यांना साखरखेर्डा येथे आदर्श शिक्षिका राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला होता .निरंतर करत असलेल्या कार्यामुळे त्यांची नोंद घेण्यात आली . सदर मिळालेला पुरस्कार सरकटे यांनी त्यांच्या आई-वडिलांना समर्पित केला आहे . पुरस्कार मिळाल्याबद्दल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

## ठाणे महापालिका मुख्यालयातील ओल्या कचऱ्यापासून आवारातच खत निर्मिती सुरू.

संतोष पडवळ: दैनिक विश्वजगत



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयातील उपहारगृहात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे मुख्यालयाच्या आवारातच खत तयार करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे या प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. इंडियन पोल्युशन कंट्रोल असोसिएशनमार्फत स्वर्णलता मदरसन ट्रस्टच्या सीएसआर निधीतून हा प्रकल्प राबवला जात आहे.

मुख्यालयाच्या आवारात या उपक्रमांतर्गत प्रत्येकी ४०० लिटर क्षमतेचे चार कंपोस्टिंग एअरोबिन युनिट्स बसवण्यात आले आहेत. या यंत्रणेची देखरेख आणि दररोजची निगा घनकचरा विभागाचे कर्मचारी आणि उपहारगृहातील कर्मचारी समन्वयाने करीत असल्याची माहिती आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांनी दिली आहे. कचरा निर्माण होणाऱ्या आवारातच कचऱ्याचे वर्गीकरण व व्यवस्थापन शक्य असल्याचे दाखवून देणारा हा उपक्रम आहे, असेही त्यांनी सांगितले. एसओआरटी (Segregation of Waste for Recycling and Treatment) प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात, एक संस्था आणि २० मोठ्या कचरा उत्पादक गृहसंस्थांना त्यांच्या गरजेनुसार कंपोस्टिंग एअरोबिन दिले जाणार आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार प्रत्येक मोठ्या कचरा निर्मितीच्या ठिकाणी ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन स्वत:च्या आवारात करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने ज्या गृह संकुलांत अशाप्रकारे खत निर्मिती करण्याची इच्छा आहे, अशा गृहसंकुलांच्या प्रतिनिधींनी या व्यवस्थेबाबत अधिक जाणून घेण्यासाठी पाचपाखाडी येथील महापालिका मुख्यालयातील प्रकल्पस्थळी भेट द्यावी. तसेच प्रकल्पाला भेट देण्याची वेळ ठरवण्यासाठी https://forms.gle/DJ2zuhxx83S3aBsD9 या लिंकवर नोंदणी करावी, असे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे करण्यात आले आहे.

## अमळनेर तालुक्यातील युरियाची टंचाई संदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन

यदुवीर पाटील: दै.विश्वजगत



अमळनेर- अमळनेर तालुक्यात युरिया खताची कृतींचा निर्माण करणारे वितरक यांच्यावर तात्काळ कारवाई करून अमळनेर तालुका शेतकरी संघ व अमळनेर तालुका फ्रुट सेल सोसायटी यांना तात्काळ खत युरिया व इतर खते उपलब्ध करावी यासंदर्भात शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश अर्जुन पाटील तसेच प्रवीण गोसावी , रवी पाटील यांनी जळगाव जिल्हा अधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन देऊन मागणी केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की अंमळनेर तालुक्यात युरिया खताची कृत्रिम टंचाई दाखवून खत विक्रेता दुकानदार वितरक व संबंधित भरारी पथक यांनी संगमत करून तालुक्यात युरिया खताची व इतर खतांची कृत्रिम टंचाई निर्माण केली असून व्यापारी मंडळी भाव वाढवून शेतकरी राजास अडचणीत आणून लूट अडवणूक करीत आहेत .सतत आवर्षण प्रवनक्षेत्र अमळनेर तालुका दुष्काळग्रस्त असून देखील अमळनेर शहरात तालुक्यात युरिया खताची कृत्रिम टंचाई दाखवलेली आहे .तालुक्यात दरवर्षी रासायनिक खतांची टंचाई पासून खाजगी कृषी केंद्र, व्यापारी यांनी कायम कृत्रिम टंचाई दाखवलेली आहे संबंधित आपल्या अधिपत्याखाली अधिकारी यांनी खताचा मोठा पुरवठा देऊन देखील खत विक्रेता, दुकानदार ,वितरक कृत्रिम टंचाई दाखवून जादा दराने खत विक्री करून बळीराजाची फसवणूक करून स्वत:च्या फायद्यासाठी बळीराजाला आर्थिक संकटात टाकतात अमळनेर तालुक्यातील सर्व विकास सोसायटी अमळनेर तालुका शेतकरी संघ अमळनेर तालुका फ्रुट सेल सोसायटी शासनाच्या सहकारी क्षेत्रातील संस्था जादापुरवठा आपल्या आदेशाने झाल्यास बळीराजास जादा दराने खत खरेदी करण्याची आवश्यकता राहणार नाही .तरी याची तात्काळ दखल घेऊन युरिया खताचा पुरवठा करण्याची मागणी केली आहे. संबंधित कृषी अधीक्षक यांनी या बाबीची तात्काळ दखल घेऊन तालुका स्तरावर खत विक्रेता वितरक यांच्या दुकानाची व गोडाऊनची तपासणी करून शेतकऱ्यांना मुबलक युरिया उपलब्ध करून द्यावा . संबंधित निवेदनाची प्रत उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , जळगाव जिल्हा पालकमंत्री,कृषी मंत्री तसेच नाशिक आयुक्त यांच्याकडेही देण्यात आले आहेत. या निवेदनावरती प्रवीण पाटील रवी पाटील यांच्या देखील स्वाक्षरी आहेत .

## पंचायत समिती कोरपना येथे कृषी दिन कार्यक्रमात शेतकरी हवामान बदल आधारीत तंत्रज्ञान विकसित करा आवाहन : विजय पेंदाम गटविकास अधिकारी प. स. कोरपना



कवडु गाताडे: दैनिक विश्वजगत

चंद्रपूर -महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन म्हणून कोरपणा पंचायत समितीच्या सभागृहामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून हरितक्रांतीचे जनक व राज्यांमध्ये 1968 ते 72 या कालावधीमध्ये पडलेल्या तीव्र दुष्काळ व संकटाचा सामना करत असताना निर्भीडपणे व दृढ निश्चय करून कृषीमध्ये क्रांती आल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाहीअसा निर्धार करून कृषी विद्यापीठ संकरित वाणाची निर्मिती उत्पादनामध्ये वाढ उद्योग क्रांती यासह शेतकऱ्यांमध्ये नावीन्यपूर्ण शेतीसह सिंचनाचं क्षेत्र विकसीत करणारे मुख्यमंत्री म्हणून समाजामध्ये मातीशी नातं जुळलेल्या वसंतराव नाईक यांच्या कृषी दिनाचे उचित साधून या ठिकाणी शेती विषयक व शासकीय योजनेचे लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी समोर यावे याचबरोबर शेतीमध्ये क्रांती करावी असे आवाहन स् गटविकास अधिकारीविजय पेंदाम यांनी आवाहन केले हे या सभेच्या अध्यक्षस्थानी होते यावेळी तालुका कृषी अधिकारी गोविंद ठाकूर यांनी वसंतराव नाईकांच्या आठवणीला उजाळा देत शेतीमध्ये झालेला बदल व यावर आधारित तंत्रज्ञानाची गरज व्यक्त केली यावेळी सामाजिक कार्यकर्ते सय्यद आबिद अली यांनी महाराष्ट्रामध्ये 1970 ते 72 या कालावधीतील दुष्काळाची भयानक स्थिती त्यावेळी परदेशामध्ये जनावरे खाणारे मिलो जवारी मक्का अन्य धान्याचा तुडवळा राज्यामध्ये पडला होता पाण्यासाठी वन वन हिंडण्याची पाळी ग्रामीण भागामध्ये विदारक चित्र निर्माण झाले होते त्यावेळेस जंगल व्याप्त क्षेत्र होता प्रदूषण पर्यावरण याचा समतोल होता अशाही परिस्थितीमध्ये मुख्यमंत्री असतानावसंतराव नाईक यांनी केलेली कामगिरी ही विसरता येणार नाही हरितक्रांती उत्पादनामध्ये वाढ ही सर्व काही त्यांच्या प्रयत्नातून साकार झालेलं आज आपण पाहतोय आज जगाच्या पातळीवर तापमानाने हैदोस घातला तर दुसऱ्याकडे महाराष्ट्रामध्ये प्रदूषण पर्यावरणामुळे मानव जातीचे आरोग्य धोक्यात आलं अशी परिस्थिती आज असतानाजल जंगल जमीन याच शोषण होत असल्यामुळे कोरोना सारख्या भयानक संकटाच्या काळात सावरण्याचा काम देशांमध्ये झालं असं असताना सर्वत्र जंगल प्राप्त क्षेत्रामध्ये याचा परिणाम अल्प प्रमाणात दिसून आला मात्र ज्या ठिकाणी अधिक विकसित शहर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनेकांना जीव गमावावी लागली ऑक्सिजनची कमी हा भाग असला तरी जंगलाची झालेली रास हा याचा परिणाम आहे आज शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाबरोबर शेतीमध्ये धन धान्याबरोबर इतर आर्थिक दृष्ट्या परवडणारी शेती करणे गरजेचे आहे केंद्र राज्य शासनाच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजना यामध्ये मोठ्या प्रमाणात बांबू लागवडीसह जमिनीची सुपीकता व जलसंधारणाची कामे करण्याची संधी शेतकऱ्यांना आहे शेतकरी हा कोणत्याही परिस्थितीत न थांबणारा एक चाक आहे म्हणून सर्वाधिक शेतीमधूनच पर्यावरणाचा समतोल राखता येतं यासाठी शेतकऱ्यांनी बांबू लागवडीचा पर्याय उत्तम असून भविष्यात वाढत्या औद्योगीकरणांमध्ये पावर प्लांट मध्ये पेपर मिल मध्ये बांबूची मागणी लक्षात घेऊन नदीपट्ट्याच्या काठावर नाल्याच्या काठावर पडीत जमिनीवर बांबू लागवडीचा कार्यक्रम घेऊन आपण संकल्प करूया आणि या कृषीदिनानिमित्त कोर पाण्यात तालुक्यामध्ये बांबू लागवडीची एक यशस्वी चळवळ सर्वांच्या सहकारातून आपण पुढे नेण्याचा संकल्प करू असे म्हणत आजच्या निमित्ताने सर्वांना कृषी दिनाच्या शुभेच्छा देत शेतीमध्ये प्रगती व्हावी अशी आशा व्यक्त केली यावेळी सहाय्यक गट अधिकारी होळकर कृषी अधिकारी दूधे यांच्यासह ग्रामसेवक पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी महिला संघाच्या कार्यकर्ते सदन शेतकरी त्याचबरोबर कृषी विभागाचे कर्मचारी ग्राम रोजगार सेवक इत्यादी बहुसंख्येने उपस्थित होते सर्वांनी कृषी दिनाचा उत्साह साजरा करून कृषी दिनाच्या शुभेच्छा दिल्या आभार प्रदर्शन श्री गाडगे विस्तार अधिकारी यांनी मानले